पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १०
**सभावृत्तांत**

दिनांक :- १२ / ०९ / २०१२ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - १२ / ०९ / २०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. भारती फरांदे - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. सौ. साळुंके सविता सुरेश
५) मा. आल्हाट मंदा उत्तम
६) मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
७) मा. काळे विमल रमेश
८) मा. बाबर शारदा प्रकाश

याशिवाय मा.कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२ :- प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाचे भाडे अदा करणेबाबत...

विषय क्र.३ :- झाडे व बागकामांच्या प्रशिक्षणाबाबत - मा.किरण मोटे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४ :- प्रशिक्षण देणेबाबत - मा.मंदा आल्हाट, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ :- व्यवसाय सुरु करण्यासाठी मदत देणेबाबत - मा.किरण मोटे, मा.वैशाली जावळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६ :- बालवाडीतील मुला मुलींना पोषक आहार देणेबाबत - मा.किरण मोटे, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ :- पहिल्या अथवा दुस-या मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-यांसाठी अर्थसहाय्य योजना राबविणेबाबत - मा.किरण मोटे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८ :- लॅपटॉप मोफत देणेबाबत - मा.किरण मोटे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९ :- पुरक पोषण आहार सुरु करणेबाबत - मा.वैशाली जवळकर, मा. मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१० :- खेळणी उपलब्ध करुन देणेबाबत - मा.वैशाली जवळकर, मा. मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

----------

**दिनांक ०८/०८/२०१२ व २२/०८/२०१२ (दुपारी १.४५ व ३.१५) रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ९ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - १
दिनांक - १२/०९/२०१२ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/६/कावि/९५४/२०१२, दि.२८/०८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत दि.३१/०३/२०१३ अखेर पर्यंतच्या कालावधीत प्रस्तावा सोबतचे प्रपत्र "अ" नुसार एकूण १५ विषयांचे प्रशिक्षण हे वस्तीपातळीवर महिलांच्या मागणीनुसार व वेळेत सदरची प्रशिक्षण योजना राबविणेकामी व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यास तसेच या योजनेचा मुळ उद्देशही महिलांना प्रशिक्षण देणे हाच असून संस्थेला कामाचे आदेश देताना स्वयंरोजगाराची अट काढण्यात यावी व प्रशिक्षण देणे हाच मुळ उद्देश ठेवणेस तसेच महिलांना जास्तीत जास्त कोर्सेसचे प्रशिक्षण घेता यावे यासाठी महिलांनी यापूर्वी काही कोर्सेसचे प्रशिक्षण घेतले असले तरी त्यांनासुध्दा प्रशिक्षणाचा लाभ देणेस व एका पेक्षा अधिक प्रशिक्षण घेण्यास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक - २
दिनांक - १२/०९/२०१२ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सूचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा. सविता साळुंके
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नावियो/१०/कावि/१३७/२०१२, दि.१०/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या माहिती, शिक्षण, संपर्क या घटकांतर्गतचे महिलांकरीता दिनांक २५/०७/२०१२ चे आयोजित मेळाव्याचे प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाचे भाडे र.रु.११,०६०/- व इतर भाडे र.रु.४,४१२/- असे एकूण र.रु.१५,४७२/- महिला व बाल कल्याण योजनेच्या तरतुदीतून खर्च करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - ३
दिनांक - १२/०९/२०१२
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा. सविता साळुंके
संदर्भ - मा.किरण मोटे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील महिलांच्या मागणीनुसार पिंपरी चिंचवड शहर हे सिमेंटचे जंगल बनत चाललेने झाडे व बागकामांच्या प्रशिक्षणाला अत्यंत मागणी आहे. त्यानुसार प्रगती बायोटेक ही संस्था महिलांकरिता प्रशिक्षण देणेचे काम करीत असून त्यांचे थेरगांव येथे टिश्यु कल्चर लॅब आहे. त्या माध्यमातून ते महिलांना - १) टेरस बाग व टेरस शेती, २) बॉन्साय बनविणे, ३) कलम करणे, ४) हँगिंग प्लँन्ट इ. प्रशिक्षण देत आहे. तसेच महिला प्रशिक्षण संस्था असल्याने प्रत्येक लाभार्थी फी प्रत्येक ७००/- रु. मध्ये प्रशिक्षण देणेस तयार आहे. तरी प्रगती बायोटेक या संस्थेकडून वरील प्रशिक्षण देणेस व त्याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - ४
दिनांक - १२/०९/२०१२
सूचक - मा.मंदा आल्हाट अनुमोदक - मा.विमल काळे
संदर्भ - मा.मंदा आल्हाट, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेतील इ. ५वी, ६वी व ७वी मधील प्रत्येकी ३० विद्यार्थ्यांना म्हणजेच एकूण ९० विद्यार्थ्यांना आठवडयातून १ दिवस (१ तास ३० मिनिटे) ज्ञानप्रबोधिनी शाळा, निगडी येथे मुक्तांगण विज्ञान शोधिका यांच्याकडून महिला व बाल कल्याण विभागामार्फत प्रशिक्षण देणेस तसेच त्याकामी एकूण र.रु.३,००,०००/- (र.रु.तीन लाख फक्त) खर्च अपेक्षित असून सदर प्रशिक्षणास येणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक - ५
दिनांक - १२/०९/२०१२
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर
संदर्भ - मा.किरण मोटे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विधवा / घटस्फोटीत स्त्रियांना व्यवसाय सुरु करण्यासाठी मदत व्हावी यासाठी कमाल र.रु.६०००/- पर्यंत मदत ही एकदाच देणेस तसेच या योजनेसाठी अर्जदार महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न र.रु.१,००,०००/- चे आत असलेबाबत मा.तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला / रेशनकार्डवरील उत्पन्न ग्राह्य धरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक - ६
दिनांक - १२/०९/२०१२
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.मंदा आल्हाट
संदर्भ - मा.किरण मोटे, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत बालवाडीतील मुलामुलींचा शारिरीक व बुध्दीमत्तेच्या विकासासाठी पोषक आहार म्हणून टॅट्रा पॅक मधील १०० मिली दुध व १० ग्रॅम उर्जा नुट्रीशन पावडर एकत्र करुन 'पौष्टीक सुगंधी दुधाचा' प्रती लाभार्थी रु.१२.७० या दरानुसार 'अग्निवेश हेल्थ केअर सेंटर' या संस्थेस ३१।१०।२०१३ पर्यत पुरवठा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक - ७
दिनांक - १२/०९/२०१२
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर
संदर्भ - मा.किरण मोटे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महापालिका हद्दीतील पहिली मुलगी असताना शस्त्रक्रिया केल्यास किंवा पहिली मुलगी असताना दुसरी मुलगी झालेनंतर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास अर्थ सहाय्याची योजना राबविणेत येत आहे. सदरची योजना मुलीचा जन्म दि. १ जानेवारी २००७ नंतर झालेला असणे आवश्यक तसेच संबंधित मातेने अथवा पित्याने कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया दि. १ जानेवारी २००७ नंतर केले असल्यास त्यांना अर्थसहाय्य देण्यास मांन्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - ८
दिनांक - १२/०९/२०१२
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर
संदर्भ - मा.किरण मोटे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

महापालिका शाळेतून इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थिनींना र.रु.२६,०००/- पर्यंतच्या किंमतीचा लॅप टॉप मोफत देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - ९

दिनांक - १२/०९/२०१२

सूचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.मंदा आल्हाट

संदर्भ - मा.वैशाली जवळकर, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिकेच्या / बालवाडयांतील मुलामुलींना पुरक पोषण आहार उपलब्ध करुन देणेबाबत खालील अटी शर्ती राहतील - १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालवाडयांतील मुलांना व मुलींना शारिरीक, बौध्दीक विकासासाठी पुरक पोषण आहार उपलब्ध करुन देईल. २) प्रत्येक बालकास आवश्यक पुरक पोषण आहाराचे प्रमाण व स्वरुप प्राथमिक शिक्षण विभागामार्फत निश्चित करण्यात येईल. ३) बालकांच्या संखेनुसार बालवाडीस दररोज पुरवठा करावयाच्या आहाराचे प्रमाण प्राथमिक विभागामार्फत निश्चित करण्यात येईल. ४) पुरक पोषण आहार बालकास देण्यायोग्य असल्याची खात्री करण्याकरीता योग्य त्या यंत्रणेमार्फत शिक्षण विभागाकडून नियमित तपासणी करुन घेणेत येईल. ५) बालकास खाण्यास योग्य आहार असल्याबाबत खात्री करुन त्याचे वाटप संबंधित अंगणवाडी शिक्षिके कडून करण्यात येईल व त्याचे रेकॉर्ड ठेवण्यात येईल. ६) पुरक पोषण आहाराचा पुरवठा करणा-या पुरवठाधारकास / महिला संस्था / महिला बचतगट हा अन्न परवानाधारक असणे आवश्यक राहिल. ७) सदर योजनेचा लाभ देणे अथवा न देणे किंवा योजनेमध्ये आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करण्याचा अधिकार मा.अति.आयुक्त अथवा मा.आयुक्त यांना राहिल.
वरील प्रमाणे नविन योजना सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - १०

दिनांक - १२/०९/२०१२

सूचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.मंदा आल्हाट

संदर्भ - मा.वैशाली जवळकर, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड परिसरातील महापालिकेच्या बालवाडयांतील मुला / मुलींच्या बौध्दीक विकासासाठी मोफत खेळणी उपलब्ध करुन देणेबाबत खालील प्रमाणे अटी शर्ती राहतील - १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बालवाडयातील मुला मुलींना बौधिदक विकासाकरीता खेळणी उपलब्ध करुन देण्यात येतील. २) प्राथमिक शिक्षण विभाग खेळण्यांचा प्रकार व प्रत्येक बालवाडीकरीता आवश्यक खेळण्यांची संख्या निश्चित करेल. ३) खेळणी उपलब्ध करुन देण्याकरीता संबंधित बालवाडी शिक्षिकेने प्राथमिक शिक्षण अधिकारी यांचे शिफारशीसह मागणी करणे आवश्यक राहिल. ४) सदरची खेळणी आवश्यकतेनुसार तीन वर्षातून एकदा देण्यात येतील. ५) सदर योजनेचा लाभ देणे अथवा न देणे किंवा योजनेमध्ये आवश्यकतेनुसार योग्य ते बदल ते बदल करण्याचा अधिकार मा.अति.आयुक्त अथवा मा.आयुक्त यांना राहिल.
वरील प्रमाणे नविन योजना सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

या नंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( भारती फरांदे )**
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/ ११८१ /२०१२
दिनांक :- १५ / ०९ / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.